R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १

दि. ६ डिसेंबर २०२५, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# सौर ऊर्जेच्या वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

छत्रपती संभाजीनगर(जिमाका)- देशात महाराष्ट्र सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्र १६ हजार मेगावॅट निर्मिती करु. त्यामुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राने विश्र्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्र्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्र्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे कार्ल सॅबेले यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यास राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे -बोर्डीकर, आमदार सर्वश्री संजय केणेकर, नारायण कुचे, प्रशांत बंब,सुरेश धस, श्रीमती. अनुराधा चव्हाण, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्र्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

सौरपंप स्थापित करण्याच्या क्षमतेत वाढ मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रखर दुष्काळाचा सामना करतांना नेहमीच पाण्याची आणि विजेची अडचण होती. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता करतांना विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यात अडचण होती. दिवसा वीज मिळावी ही प्रमुख मागणी होती. रात्री अपरात्री शेतावर जाण्यात विषारी जीवजंतू,




जनावरांची भीती होती. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे फिडर हे सौर ऊर्जेवर नेण्याचे धोरण निश्र्चित केले. त्यातून एक लाख सोलर पंप ची योजना आखण्यात आली. ही योजना इतकी ,खूप चांगली असल्याने अन्य राज्यांनी जशीच्या तशी राबवावी,असे पत्र केंद्रांमार्फत इतर राज्यांना पाठविण्यात आले. त्यानुसार 'कुसुम' ही केंद्राची योजना तयार झाली. याच योजनेअंतर्गत आज देशात सर्वाधिक ७ लाख पंप राज्याने बसविले आहेत. शेतकऱ्यांनी मागणी केल्यापासून ते पंप बसविण्याच्या क्षमतेत वाढ करुन आपण प्रतिक्षा कालावधी कमी केला. महावितरणचे कर्मचारी अधिकारी. सगळ्या पुरवठादारांचे कर्मचारी, तंत्रज्ञ यांच्या मेहनतीमुळे आज आपण हा विश्र्वविक्रम करु शकलो. आता हा आपला विक्रम आपणच मोडू,असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. पुढच्या वर्षभरात सौर कृषी पंपांची संख़्या १० लाख झाली पाहिजे,असेही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सांगितले.

सौर ऊर्जेद्वारे १६ हजार मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अशा प्रकारे सौर ऊर्जेचा वापर वाढवून आपण शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र १६ हजार मेगा वॅट वीज निर्मिती करु शकतो. शिवाय ही वीज निर्मिती कोणत्याही प्रदूषणाशिवाय असेल. तिचा निर्मिती खर्च कमी असल्याने इतर क्षेत्राला लागणारी वीज मुबलक आणि स्वस्तात उपलब्ध होईल. त्यामुळे दरवर्षी ३ टक्क्यांनी आपण विजेचे दर कमी करु, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे सांगितले की, सौर ऊर्जेचा वापर वाढल्यामुळे सौर ऊर्जा उपकरण निर्मिती कंपन्या, वेंडर्स, कामगार, देखभाल करणारे अशा १ लाख लोकांना रोजगार मिळाला. त्यामुळे ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा देणारी ही योजना आहे.

मराठवाड्याचा वाटा मोठा मराठवाड्याचे कौतुक करतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या योजनेच्या अंमलबजावणीत मराठवाड्याने आघाडी घेतली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ हजार पंप लावण्यात आले. शेतकऱ्यांना नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजनेमार्फत अन्य लाभ, बाजाराची उपलब्धता देऊन शेती शाश्र्वत कशी होईल, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. नदी जोड सारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून वाहून जाणारे पुराचे पाणी मराठवाड्यात,विदर्भात व उत्तर महाराष्ट्रात नेऊन दुष्काळ मुक्ती करायची आहे. या सर्व उपाययोजनांमुळे शेती समृद्ध आणि शाश्र्वत होईल. आमचे सरकार हे शेतकऱ्यांप्रती समर्पित सरकार असून शेती शाश्र्वत होईपर्यंत आम्ही प्रयत्न करीत राहू, असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला.

महाराष्ट्र थांबणार नाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यातील जनतेचे आभार व्यक्त केले. जनतेला समर्पित वर्ष होते. सगळ्यांच्या जीवनात मूलभूत परिवर्तनसाठी योजना आणल्या त्या कार्यान्वित केल्या. महाराष्ट्र थांबणार नाही, असाच पुढे जात राहील, हा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सुरुवातीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यातील सौरकृषी पंपाचे डिजिटल लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी लाभार्थी शेतकऱ्यांशी दूरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. गिनीज बुक विक्रम नोंदचे निरीक्षक पंच कार्ल सॅबेले यांनी विक्रमाची घोषणा केली. प्रमाणपत्र व मेडल मान्यवरांना प्रदान केले. सौर कृषी पंप योजनेसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या एआयआयएम बँकेसोबतच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. बँकेचे प्रत्युष मिश्रा व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

कार्ल सॅबेले म्हणाले की, विक्रमासाठी ३५ हजार पंप स्थापित करणे आवश्यक होते मात्र प्रत्यक्षात ४५ हजार ९११ पंप स्थापित करण्यात आले, हा एक विश्र्वविक्रम आहे. या प्रत्येक पंपाच्या उभारणी ते कार्यान्वयन या सर्व टप्प्यांवर पडताळणी करुनच या विक्रमास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर व मंत्री अतुल सावे यांनीही यावेळी उपस्थितांशी संवाद साधून सौर कृषी पंप योजनेमुळे शेती क्षेत्रात आणि अर्थकारणात मोठे बदल होतील,असा विश्र्वास व्यक्त केला. या ठिकाणी लावलेल्या सौर ऊर्जा उत्पादनांच्या प्रदर्शनालाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली व पाहणी केली.

प्रास्ताविक लोकेश चंद्रा यांनी केले. तर निता पानसरे यांनी आभार मानले. नीता पानसरे, आश्र्विनी दाशरथे, प्रेषित रुद्रावतार यांनी सूत्रसंचालन केले.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला कायदा व सुव्यवस्थेचा आढावा

सांगली,(जि. मा. का.) : राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला.




पोलीस अधीक्षक कार्यालयात झालेल्या या बैठकीस पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, पालकमंत्री महोदयांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, पोलीस निरीक्षक सर्वश्री सतीश शिंदे, संजीव झाडे, विशाल टकले आणि संजय मोरे आदि उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, नागरिकांच्या सुरक्षेस पोलीस प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे. गुन्हेगारांवर नियंत्रणासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक तेथे कठोर पावले उचलावीत. गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी कायद्याचा धाक निर्माण करावा. या अनुषंगाने सांगली शहरातील सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रस्ताव राज्य स्तरावर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तोपर्यंत एमआयडीसी क्षेत्रातील वाढलेली गुन्हेगारी लक्षात घेऊन त्यावर नियंत्रणासाठी अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणेबाबतचा तात्काळ आराखडा बनवून जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्ह्यातील शांतता, सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना आखाव्यात. त्यासाठी मॉडेल विकसीत करा. ब्लॅक स्पॉटच्या ठिकाणी लाईट, अद्ययावत सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, गस्त वाढवावी. कार्यवाही दरम्यान काही अडीअडचणी येत असतील तर त्या मांडाव्यात त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करू. अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने विविध विभागांच्या समन्वयाने काम केले त्यामुळे अमली पदार्थ तस्करांवर वचक बसण्यास मदत झाली. त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी कार्यवाही करावी. अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने सविस्तर सादरीकरण केले.




# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विलेपार्ले येथे सांस्कृतिक कार्यक्रम

मुंबई,: प्रतिभावान दिव्यांग कलाकारांना एक अर्थपूर्ण व सर्जनशील मंच उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या कलागुणांचा समाजापुढे गौरवपूर्ण परिचय करून देणे, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांनी ३ डिसेंबर या जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले येथे ३ डिसेंबर रोजी प्रतिभावान दिव्यांग कलावंतांचा 'स्वर-पंख' या चित्रपट गीतांच्या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

स्वर-पंख हे शीर्षक असलेला व वो सुर जो उड़ान देते हैं, अपने पंख ख़ुद बनाकर ही टॅगलाइन असलेला हा कार्यक्रम संगीत संयोजक, सर्व गायक, वादक हे प्रतिभावान (दृष्टिहीन आणि गतिशीलता) दिव्यांग कलावंत यांनी सादर केला. त्यामध्ये संगीत संयोजन बिपिन वर्तक, गायक- बिपिन वर्तक, विनोद गावडे, आफताब ठाकूर, मकरंद भोसले, सारिका शिंदे, श्रध्दा, गौरी तसेच प्रमुख वादक संतोष मोहिते, नागेश कांबळे यांचा सहभाग लाभला.

या कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री ड.आशिष शेलार यांनी विशेष उपस्थिती लावली. यावेळी बोलताना त्यांनी स्वरपंख हा एक आगळा-वेगळा कार्यक्रम असून यामध्ये अतिशय प्रभावशाली दिव्यांग कलाकार सहभागी झालेले आहेत. दिव्यांग बंधू भगिनी यांना ईश्र्वराने विशेष शक्ती दिलेली असून ती वेगवेगळ्या स्वरूपात बाहेर येत असते. तीच शक्ती संगीत आ णि गीताच्या माध्यमातून आज आपणाला दिसत आहे. दिव्यांग कलाकार आणि सामान्य माणूस एकच असून एकसमान गतीने चालले पाहिजे त्यासाठी कला हे एक माध्यम असल्याचे ते म्हणाले. सांस्कृतिक कार्य विभागार्फत राज्यभरात १२०० सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत, असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

या कार्यक्रमाचे संयोजन अतुल साटम, कनक क्रिएशन यांनी केले. स्वर- पंख या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांची असून या कार्यक्रमास सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. दिव्यांग कलावंतांच्या या अद्वितीय संगीत कार्यक्रमास प्रेक्षकांनी भरघोस प्रतिसाद दिला.

## डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता !

विश्र्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दीन. महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.

डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.

इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते.

पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन!!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# संविधानिक मूल्य अंगीकारणे हीच खरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली

६ डिसेंबर हा दिवस विश्र्वरत्न भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन .त्यानिमित्त त्यांना प्रथमतः विनम्र अभिवादन .६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जगभरातून कोट्यावधी लोकशाहीवादी, मानवतावादी, संविधानवादी लोक मनोभावे त्यांना आदरांजली अर्पण करतात .

मी प्रथमतः भारतीय व अंतिमतः ही भारतीयच असे म्हणणारे डॉक्टर बाबासाहेब यांनी तर या देशाचा हजारो वर्षांचा गुलामगिरी व विषमतेने बरबटलेला इतिहासच बदलून टाकला .हे काम सोपे नव्हते .रक्ताचा थेंबही न सांडता स्वदेशीयांचे विचार बदलण्याचे,मानसिकता बदलण्याची ताकद ही फक्त विद्वानातच असते म्हणून तर अमेरिकेच्या कोलंबस विद्यापीठाने जाहीरच करून टाकले की २१ व्या शतकातील जगामध्ये सर्वात विद्वान व्यक्ती म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रक्रमाने येते त्यांनाच ज्ञानाचे प्रतीक अर्थातच द सिम्बॉल ऑफ नॉलेज संबोधले .

या देशाला महासत्ता बनवायचे असेल तर प्रथमतः या देशातील प्रत्येक व्यक्तीला विविध पातळ्यावर सक्षम बनवले पाहिजे .सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक दृष्ट्या विकसित करण्यासाठी त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये रुजवावी लागतील . ती विविध मूल्ये भारतीय संविधाना मध्येच अंतर्भूत आहेत .

संविधानाच्या उद्देशिकेतील स्वातंत्र्य समता बंधुता, न्याय, सार्वभौमत्व, समाजवादी, धर्मनिरपेक्षता हे सर्व शब्द भारतीय संविधानातील मूल्य प्रणाली आहेत .मूल्यांना तेव्हाच मौलिकत्व प्राप्त होते जेव्हा ही मूल्ये व्यक्ती समाज आणि देशातील लोक अंगीकारून जगू लागतात .शालेय अभ्यासक्रमापासून ही मुल्ये अभ्यासक्रमात विविध पाठाच्या घटकाच्या रूपाने अंतर्भूत



केलेली आहेत पण रुजविण्याची विकसित करण्याची गोष्ट म्हणावी तेवढी साधी सोपी नाही .बालकांच्या मनात ही मूल्ये रुजवत असतानारुजविणाऱ्या शिक्षक अथवा व्यक्तींना स्वतः पासून संघर्षाला प्रारंभ करावा .

स्वातंत्र्य हे मूल्य आहे आणि ते स्वतः मी अवलंबणार .माझ्या जीवनात अंगीकारणार असे जाणीवपूर्वक ठरल्यानंतर काय काय होते ?माझ्या इतकेच दुसऱ्याचे स्वातंत्र्य ही महत्त्वाचे आहे .संविधानकर्त्यांने स्वातंत्र्याच्या अधिकारात भाषण अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने विनाशस्त्र एकत्र जमण्याचे, भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे व कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचे अधिकार दिले .एखाद्या व्यक्तीला आपण त्याची मांडत असलेले विचार मध्येच थांबवून तू गप बस . तुला काय कळते ? असे जेव्हा म्हणतो तेव्हा त्या व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर विचार व्यक्त करण्याच्या मताधिकारवरआपण निर्बंध आणतो .म्हणजेच याचाच अर्थ दुसऱ्याच्या मताचा आधार केला पाहिजे ह्या मूल्याचे अवमूल्यन करतो म्हणजेच हे मूल्य व्यक्तीत व्यवस्थित न रुजल्याने वैयक्तिक अथवा सामूहिक संघर्ष निर्माण होतो .स्वातंत्र्य हे मूल्य प्रामाणिकपणे अंगी करायचे असेल तर स्वतःहून घालून घेतलेल्या अनेक बंधनात अडकून राहावे लागते .

समाजाने आणि देशाने देखील ही मुल्ये अंगीकारून जगावे लागते . देश निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधी मार्फत चालतो .लोकशाहीतील शासन बहुमताने सत्तेवर येते एखादे वेळी प्रचंड बहुमताने सत्तेवर आलेल्या व नामशेष विरोधी पक्ष राहिलेल्या सरकारला वाटेल ते कायदे करण्याचा अधिकार नाही .दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला बाधा येईल असे कायदे करता येत नाही

# भविष्यात पैशाचे महत्त्व शुन्य नि काम ऐच्छिक ठरेल

आर्टिफिशियल इंटेलिजेन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आजच्या काळातील सर्वात परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक आहे. हे आपले जीवन, कार्यपद्धती आणि संवाद साधण्याची पद्धत बदलत आहे. एआय हे एकप्रकारे मशीनच्या रुपात मानवाप्रमाणे समस्या सोडवणे, निर्णय क्षमता, तर्कसंगतता व नवीन गोष्टी शिकण्याचे काम करते.

आर्टिफिशियल इंटेलिजेन्सची संकल्पना प्राचीन काळापासूनची असून यात अनेक कथांचा देखील समावेश आहे. एआयचा औपचारिक अभ्यास हा २० व्या शतकात सुरु झाला. १९५६ मध्ये जॉन मॅकार्थी यांनी सर्वात प्रथम डार्टमाउथ कॉन्फरन्समध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजेन्स' ही संकल्पना वापरली. येथूनच एआयच्या अभ्यासाला सुरुवात झाली. एआयच्या विकासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९५० मध्ये लन ट्युरिंग यांनी केलेली ट्युरिंग चाचणी. ही चाचणी मशीनची बुद्धिमत्ता क्षमता ही मानवी वर्तनाच्या तुलनेत वेगळी नसते हे स्पष्ट करते. येथूनच, भविष्यातील एआय संशोधन आणि विकासाचा पाया घातला गेला.

रोबोटिक्सचे भविष्य खूप महत्त्वाचे आहे, कारण ते मानवी जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित बनवेल. रोबोट्स आता केवळ उत्पादनापुरते मर्यादित नाहीत, तर ते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने अधिक स्वायत्तपणे विचार करतील, शिकतील आणि नवीन परिस्थितीशी जुळवून घेतील. यामुळे आरोग्यसेवा, शिक्षण, आपत्कालीन व्यवस्थापन आणि वाहतूक यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल अपेक्षित आहेत. रोबोट ही अशी साधने आहेत जी स्वायत्तपणे जाणू शकतात, तर्क करू शकतात, योजना करू शकतात आणि कृती करू शकतात. स्वतंत्रपणे कामे करण्यासोबतच ते मानवी क्षमता वाढवू शकतात आणि मानवी कृतींची नक्कल करू शकतात.

भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणा-या रोबोटिक्स बाजारपेठांपैकी एक आहे. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबोटिक्सच्या आकडेवारीनुसार २०२१ ते २०२४ पर्यंत भारतात रोबोट स्थापनेत सुमारे ८४ टक्के वाढ झाली. वार्षिक औद्योगिक-रोबोट स्थापनेच्या बाबतीत भारत आता जगातील सहाव्या क्रमांकाचा देश आहे. २०२५ मध्ये रोबोटिक्सचे भविष्य हा सर्वात मोठा प्रश्न्न आहे. कारण या क्षेत्राने सिद्धांताच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष अवलंबनात प्रवेश केला आहे.

एआयच्या विस्तारामुळे एकीकडे नोक-यांवर टांगती तलवार उपस्थित झाली आहे. तर दुसरीकडे एआयच्या वाढत्या जाळ्यामुळे भविष्यात नोकरी गरजेपेक्षा छंद म्हणून केली जाईल. लोकं फक्त आवड म्हणून नोकरी करतील. हा बदल समाजाच्या रचनेत मूलभूतपणे बदल करेल आणि लोकांच्या भूमिका पूर्णपणे बदलेल. या बाबतीत जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती इलॉन मस्क यांनी धक्कादायक भविष्यवाणी करत एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सद्वारे पूर्णपणे बदललेल्या भविष्यातील जगाचे व्यापक दृष्टिकोन सादर केले.

पुढच्या १०-२० वर्षात एआय आणि रोबोटिक्स इतके प्रगत होतील की जगातील बहुतेक कामं ही मशीन्स करतील. लोकं इच्छा असेल तरच काम करतील. जेव्हा मशीनच सर्व गरजा विनामूल्य किंवा अतिशय स्वस्तात पूर्ण करू लागतील, तेव्हा सध्याची चलनव्यवस्था आणि पैशाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी होईल. तुमच्या खिशातला पैसा, नोटा आणि बँक कार्ड्स भविष्यात कदाचित काहीही कामाचे राहणार नाहीत. एआय आणि रोबोटिक्स झपाट्याने विकसित झाल्यास 'पैसा' हे फक्त औपचारिक साधन राहील. कारण एआय आणि रोबोटिक्स इतक्या वेगाने प्रगत होतील की, उत्पादनासाठी मानवशक्ती किंवा मोठ्या संसाधनांची गरजच उरणार नाही. वस्तूंची मुबलकता वाढली तर 'पैसा' या संकल्पनेची किंमत उरेलच असे नाही.

भविष्यात ऊर्जा हीच खरी करंसी ठरू शकते. ऊर्जा ही उत्पादनाची मूळ ताकद असल्याने तिचे महत्त्व पैशापेक्षा जास्त होईल. इलॉन मस्क यांनी स्कॉटिश लेखक इयान बँक यांच्या 'कल्चर' सीरिजचा दाखला देत एका अशा समाजाचे वर्णन केले आहे की, जिथे काहीच कमी नसते आणि पैसा अस्तित्वातही राहत नाही. सोलर पावर्ड एआय आणि स्पेसमधून ऊर्जा मिळवणा-या तंत्रज्ञानामुळे भविष्यात अशी दुनिया वास्तवात उतरण्याची शक्यता व्यक्त केली.

जग जसं पुढे चाललं आहे, तसं जगाचे भविष्य एआयद्वारे ठरवले जाईल आणि त्या जगात 'पैसा' नाहीसा होईल. नोक-या पर्यायी छंद बनतील म्हणजेच लोकांना जीवन जगण्यासाठी काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि गरिबी अस्तित्वात राहणार नाही. एआय आणि ह्युमनॉइड रोबोट्समध्ये पहिल्यांदाच ख-या अर्थाने गरिबी दूर करण्याची क्षमता आहे. कारण जेव्हा ह्युमनॉइड रोबोट्स उत्पादन स्वस्त आणि जलद करतील, तेव्हा मूलभूत वस्तू इतक्या परवडणा-या होतील की आर्थिक संकट येणार नाही. तसेच लोकं कोणतेही उत्पादन आणि सेवा सहजपणे मिळवू शकतील.

टेस्ला ही ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करणारी एकमेव कंपनी राहणार नाही. अनेक कंपन्या ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करतील आणि तंत्रज्ञान जगाला श्रीमंत करेल. एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान जगातील प्रत्येकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. या प्रणाली विकसित होताना मानवी जीवनातील आर्थिक संघर्ष पूर्णपणे संपुष्टात येतील आणि मानवांना काम करायचे की नाही हे निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. जेव्हा रोबोट सर्व कामं हाती घेतील तेव्हा सरकारला युनिव्हर्सल हाय इन्कम प्रदान करावे लागेल, जे साध्या मूलभूत उत्पन्नापेक्षा खूप जास्त असेल. येत्या काळात हा बदल अधिकाधिक स्पष्ट होईल.

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम -सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर

मुंबई:-राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा अधिक लोकाभिमुख, अधिक सक्षम, तंत्रशुद्ध व सेवाभावी बनवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील वेगवेगळ्या केडरवर काम करणाऱ्या राज्यभरातील सुमारे दोन लाख कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण देणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.




आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई येथे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षणासंबंधी सादरीकरण करण्यात आले. या बैठकीला राज्यातील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रांचे प्राचार्य, आरोग्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रविंद्रन, आरोग्यसेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉक्टर नितीन अंबाडेकर, आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रशिक्षण हा आरोग्य क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी, चांगली वागणूक देण्यासाठी, कामकाजात गतिमानता, तांत्रिक कौशल्य येण्यासाठी तसेच कार्यक्षमता वाढण्यासाठी प्रशिक्षण हा महत्त्वाचा घटक असल्याने, आरोग्य विभागात विविध पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तांत्रिक व प्रशासकीय प्रशिक्षण देणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी एसईआरसीएच, पीएचएफआय, आयएमएमएएसटी, इनिशिएटिव्ह ऑफ चेंज, ताम्हिणी घाट पुणे या प्रशिक्षण संस्थांनी सादरीकरण केले. या संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेल्या आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे आपले अनुभव सांगितले. प्रशिक्षणामुळे टेक्निकल स्किल, इथिकल व्हॅल्यू, टीम मॅनेजमेंट, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट, लीडरशिप मॅनेजमेंट, व कॉन्फिडन्स वाढल्याचे सांगितले. या प्रशिक्षणाचा फायदा झाला असून, नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देण्यासाठी याचा निश्र्चित उपयोग होईल असेही सांगितले.

रुग्णालयातील सर्वसाधारण व्यवस्थापन, रुग्णाला दिली जाणारी वागणूक, उपचारातील आधुनिक तांत्रिक कौशल्ये,कृत्रिम बुद्धिमत्ता यांसह सर्व आधुनिक घटकांचा शिक्षणात समावेश असावा. तसेच प्रशिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांनी 'मास्टर ट्रेनर' बनून इतर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे, असे आरोग्यमंत्र्यांनी यावेळी सूचित केले.

# आजच्या राजकीय, सामाजिक वातावरणातून बाहेर येण्यासाठी पन्नालाल सुराणा यांचे विचार जतन करावे

लातूर : देशातील आजच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक कलुषित वातावरणातून बाहेर येण्यासाठी समाजवादी विचारवंत पन्नालालजी सुराणा यांच्या विचारांचा समृद्ध वारसा आपणास जतन करावा लागेल. अशा शब्दात विचारशलाकाचे संपादक प्रा. नागोराव कुंभार यांनी पन्नालाल सुराणा यांना श्रद्धांजली वाहिली.




ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष पन्नालाल सुराणा यांच्या निधनाबद्दल राष्ट्र सेवा दल, बाबासाहेब परांजपे फाउंडेशन, अंनिस, मराठवाडा जनता विकास परिषद, छात्र भारती, आंतर भारती, सोशालिस्ट फ्रंट व विविध समविचारी संघटनाच्या वतीने लातूर येथील बाबासाहेब परांजपे फाउंडेशन वाचनालय येथे ४ डिसेंबर रोजी आयोजित श्रद्धांजली सभेत मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली. त्यावेळी प्रा. नागोराव कुंभार हे बोलत होते. पन्नालाल सुराणा चालते फिरते प्रबोधनाचे एक विद्यापीठच होते. सातत्याने ते कार्यकर्त्यांशी संवाद करायचे. समाजाला, कार्यकर्त्याला, चळवळीला त्यांनी वैचारिक बळ दिले. त्यांच्या नावाने लातुरात सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र उभारण्यात यावे. जेणे करून लोकशाही समाजवादी कार्यकर्ते यातून तयार होतील.

प्रारंभी पन्नालाल सुराणा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितानी उभे राहून श्रद्धांजली वाहिली. यासपीठावर प्रा. नागोराव कुंभार, प्राचार्य सोमनाथ रोडे, ॲड. धनंजय पाटील, बी. आर. पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य सोमनाथ रोडे म्हणाले, पन्नालाल भाऊ अहंकार शून्य आणि कर्मयोग्याप्रमाणे जीवन जगले, सर्व पक्षात त्यांचे चाहते आहेत. भूकंपानंतर त्यांनी आपलं घर चे त्यांनी आवाहन स्वीकारले, हजारो अनाथ विद्यार्थ्यांचा ते नाथ बनले. समाजवाद, परिवर्तनाचा त्यांनी ध्यास घेतला होता. आलिशान हॉटेल मध्ये न राहता ते कार्यकर्त्यांच्या घरी राहायचे. त्यांनी उभे केलेले आपलं घर कधी उघडे पडू नये याचे आवाहन आपण स्वीकारणे हीच खरी श्रद्धांजली त्यांना ठरेल. तर ॲड. धनंजय पाटील यांनी पन्नालाल भाऊंच्या सहवासात राहिलेल्या आठवणी सांगून साधी राहणी ाणि उच्च विचारसरणी कशी होती. ते सांगितले. तर भाऊ ध्येयवादी कसे होते, त्यांच्या कार्याचा प्रभाव माझ्यावर कसा झाला.याबद्दल छात्रभारतीचे माजी प्रदेशाध्यक्ष प्रा.अर्जुन जाधव यांनी सांगितले. तसेच अशोक गोविंदपूरकर, अतुल देऊळगावकर,सूर्यप्रकाश धुत, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे,मराठवाडा विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव नरहरे, विजय चव्हाण,शेकापचे उदय गवारे, बाबासाहेब परांजपे फाउंडेशनचे बी. आर. पाटील, सुनीता आरळीकर, शिवाजीराव शिंदे, रामानुज रादंड, डॉ. गणेश गोमारे, रामकुमार रायवाडीकर, प्रा. सुभाष भिंगे, प्रा. शिवाजी जवळगेकर, कॉ. विश्र्वभर भोसले, रामराजे आत्राम, निशिकांत देशपांडे, अंनिसचे दशरथ भिसे, रुकसाना मुल्ला,हरदास तंमेवार, अनिल दरेकर, वकील संघांचे ॲड. वसंतराव उगले, शिवाजी कांबळे, ॲड. प्रदीप पाटील, शाम जैन, एल. बी. आवळे, समीर पडवळ, प्राचार्य बालाजी साळुंके, प्रा. दत्ता सोमवंशी, सुभाष निंबाळकर आदिसह अनेक मान्यवरांनी पन्नालाल भाऊंसोबतच्या आठवणी सांगून श्रद्धांजली अर्पण केली. भाऊसाहेब उमाटे यांनी सूत्रसंचालन केले.

# जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रलंबित प्रस्तावांना ८ डिसेंबरपूर्वी प्रशासकीय मान्यता घ्या - पालकमंत्री चंद्रकांत पाटील

सांगली (जि. मा. का.) : जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५-२६ अंतर्गत तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रलंबित असणाऱ्या विभागांनी जिल्हा वार्षिक योजनेचे परिपूर्ण प्रस्ताव दि. ८ डिसेंबर २०२५ पूर्वी सादर करून सर्व प्रशासकीय मान्यता वेळेत होतील याची दक्षता घ्यावी. राज्य स्तरावरील प्रलंबित मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी प्राधान्याने पाठपुरावा करावा, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे दिले.




जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५-२६ अंतर्गत राज्यस्तरीय यंत्रणा, जिल्हा परिषद, नगरपरिषद प्रशासनकडील कामांच्या योजनानिहाय आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक सभागृहात आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी अशोक काकडे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी शिवाजी जगताप, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण बाळासाहेब कामत, पालकमंत्री महोदयांचे विशेष कार्यकारी अधिकारी बाळासाहेब यादव यांच्यासह संबंधित यंत्रणांचे विभाग/ कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

ज्या कामांच्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत, त्या कामांची आदर्श आचारसंहितेचे पालन करून निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे सूचित करून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, सन २०२५-२६ च्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी पायाभूत सुविधांच्या कामांकरिता प्रत्येक विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थेला ऑनलाईन युनिक आय डी क्रमांक मिळवावा लागणार आहे. यादृष्टीने तात्काळ योग्य ती कार्यवाही तातडीने करावी, असे त्यांनी सूचित केले.

जिल्हा परिषद यंत्रणांचा आढावा घेताना प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय मान्यता प्रलंबित असल्याबद्दल पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी नाराजी व्यक्त करून सर्व प्रशासकीय मान्यतांची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत ९ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना दिले. तसेच. जिल्हा नियोजन समितीच्या निर्देशाप्रमाणे अंमलबजावणी करण्याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जनसुविधा व नागरी सुविधा या योजनेंतर्गत प्राधान्यक्रमानुसार पुढील पाच वर्षांकरिता गावनिहाय आराखडा पुढील १५ दिवसात सादर करावा. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधील मंजूर नियतव्ययापैकी किमान २५ टक्के निधी जिल्हा विकास आराखडा अंतर्गत वार्षिक कृती आराखडा यात निश्र्चित केलेली क्षेत्रे / उपक्षेत्रे संबंधित बाबीकरिता वापरण्यासाठी सर्व यंत्रणांनी कार्यवाही करावी, असे स्पष्ट करून त्यांनी यावेळी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत जिल्हा विकास आराखड्यातील बाबींकरिता केलेली तरतूद, झालेला खर्च, प्रस्तावित व साध्य उद्दिष्टे याबाबतची माहिती सर्व यंत्रणांनी ९ डिसेंबर पर्यंत सादर करण्याच्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, पालकमंत्री महोदयांच्या निर्देशाप्रमाणे सर्व यंत्रणांनी विहित वेळेत कार्यवाही करावी. तसेच आयुष्मान भारत कार्ड, ध्वजदिन निधी व अंधनिधी संकलनाची कार्यवाही प्राधान्य तत्त्वावर करावी. ज्या विभागांनी सन २०२६-२७ प्रारूप आराखडा सादर केला नाही, त्यांनी तो ८ डिसेंबरपर्यंत सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हा परिषदेकडील योजना, राज्य स्तर विभागाकडील योजना तसेच नगरपरिषद प्रशासन शाखा विभागाकडील योजनांबाबत आढावा घेतला. यामध्ये सन २०२५-२६ अंतर्गत मंजूर नियतव्यय, प्रशासकीय मान्यता प्रस्ताव व त्यावरील पुढील कार्यवाही, सन २०२५-२६ अंतर्गत मंजूर कामांच्या सद्यस्थितीचा आढावा, सन २०२६-२७ प्रारूप आराखडा याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

# भाजपाचे युवानेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते कामखेडा येथील क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ

लातूर - खेळ हा केवळ मनोरंजन नाही तर त्यात खूप मोठी संधी आहे या स्पर्धेतून मोठ्या मैदानावर खेळणारे खेळाडू तयार व्हावेत. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने सातत्याने विविध खेळाच्या स्पर्धा दर्जेदार आणि व्यापक स्वरूपात घेतल्या जातात असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी केले.



रेणापूर तालुक्यातील मौजे कामखेडा येथे तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता पार्टी आणि कला स्फूर्ती क्रिकेट क्लब यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ युवा नेते ऋषिकेश दादा कराड यांच्या हस्ते गुरुवारी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झाला. याप्रसंगी भाजपचे अनिल भिसे, अमित मोहनराव भिसे, शरद दरेकर, अमर चव्हाण, नरेश चपटे, अजय गुडे, संतोष चव्हाण, रवींद्र नागरगोजे, आप्पासाहेब पाटील, बंडू पांचाळ, रामहरी गोरे, श्रीमंत नागरगोजे, ज्ञानोबा औसेकर यांच्यासह संयोजक तुषार जोगदंड, संतोष तंगळे आदीची उपस्थिती होती.

कबड्डी, कुस्ती, क्रिकेट या खेळाबरोबरच प्रत्येक खेळाला न्याय देण्याचा आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेश कराड म्हणाले की, प्रत्येक संघ विजयाच्याच जिद्दीने स्पर्धेत उत्तरत असतो खेळाडू मैदानात उत्तरणे हाच त्याचा खरा विजय असतो. क्रिकेट स्पर्धा म्हणजे तरुणांचा उत्सव असतो या स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाव्यात असे सांगून सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

या क्रिकेट स्पर्धेत ३२ संघाने सहभाग घेतला असून या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास भाजपाचे शंकरराव भिसे यांच्यातर्फे ३१ हजार रुपये, द्वितीय येणाऱ्या संघास मंडलाध्यक्ष शरद दरेकर यांच्यातर्फे २१ हजार रुपये, तृतीय येणाऱ्या संघास अजय गुडे यांच्याकडून ११ आणि चतुर्थ येणाऱ्या संघास प्रमोद सोमवंशी यांच्यातर्फे ५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि चषक देण्यात येणार आहे.

शुभारंभाचा सामना बंजारा - ११ संघ वडवळतांडा आणि कोष्टगाव क्रिकेट क्लब यांच्यात अटीतटीचा झाला बंजारा - ११ संघाने विजय संपादन केला यावेळी मैदानावर मोठा जल्लोष झाला. स्पर्धा यशस्वी व्हाव्यात यासाठी कला स्फूर्ती क्रिकेट क्लबचे तुषार जोगदंड, संतोष तंगळे, लक्ष्मण बोडके, रामा मेकले, राहुल जटाळ, बळी साखरे, दिनेश भिंगे, महादेव पवार, आकाश खंडागळे, हरी भिंगे, प्रसाद बल्लाळ यांच्यासह अनेक जण मेहनत घेत आहेत.

# नाशिक शहरात १५ हजार नवीन वृक्षांची लागवड करणार तपोवनातील वृक्षांचे करणार पुनर्रोपण - कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन

नाशिक, (जिमाका): आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्र्वभूमीवर नाशिक शहरात नवीन १५ हजार वृक्षांची लोकसहभागातून लागवड करून त्यांचे संवर्धन करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.



शहरातील पेलिकन पार्क येथे आज दुपारी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमासाठी नियोजित जागेची त्यांनी पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार सीमा हिरे, माजी आमदार अपूर्व हिरे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल, उप अभियंता हेमंत नांदुर्डीकर, उद्यान अधीक्षक विवेक भदाणे, उद्यान निरीक्षक प्रशांत परब यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले, की राज्य शासन पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आहे. यास नाशिक शहराचा अपवाद नाही. पर्यावरण संवर्धनासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. त्यामुळेच तपोवन परिसरातील दहा वर्षांच्या आतील वृक्षांची तोड न करता त्यांचे पुनर्रोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबरोबरच नाशिक शहरात ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात येईल. ज्यामुळे पर्यावरण संवर्धनास मदत होईल. आगामी कुंभमेळा हरित आणि डिजिटल करण्याचे नियोजन आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्र्वभूमीवर शहरातील तपोवन परिसरात विविध विकास कामे करण्यात येणार आहेत. यासाठी केवळ १० वर्षांच्या आतील १ हजार ७०० वृक्षांचे पुन:रोपण शहरातील सिडको येथील पेलिकन पार्क, गंगापूर गाव येथील कानेटकर उद्यानासह उपलब्ध जागांच्या ठिकाणी केले जाणार आहे. यासह शहरात नवीन १५ हजार वृक्षांची लागवड शासन व लोकसहभागातून केली जाणार आहे. यात वड, पिंपळ, जांभूळ अशा अनेक देशी प्रजातीच्या वृक्षांचा समावेश असून १५ फूट वाढ झालेले हे वृक्ष हैदराबाद येथून मागविण्यात येणार आहेत. यासाठी आवश्यक निधी सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर) खर्च करण्यात येणार आहे. वृक्षांच्या पुन:रोपणासह नवीन लावण्यात येणाऱ्या वृक्षांची योग्य देखाभाल व निगा राखण्यात येईल. या वृक्षांमुळे हरित नाशिक- हरित कुंभमेळा संकल्पना साकार होवून आगामी काळात पर्यटनाच्या दृष्टीने नाशिकची वेगळी ओळख निर्माण होईल, असा विश्र्वास मंत्री श्री. महाजन यांनी व्यक्त केला.

## मुंबई महानगरपालिकेसाठी भाजपची निवडणूक संचालन समिती जाहीर

मुंबई-राज्यीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांची रणधुमाळी सुरू आहे. ज्यातील पहिल्या टप्प्याचे मतदान पूर्ण झाले असून मतमोजणी बाकी आहे. तर इतर दोन टप्प्यातील निवडणूकीसाठी सर्व पक्ष रणनीती आखण्यात व्यस्त आहेत. दरम्यान तिसऱ्या टप्प्यात होणाऱ्या महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई भाजपने मोठी घोषणा केली आहे. मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६ करिता भारतीय जनता पक्षाची मुंबई निवडणूक संचालन समिती घोषित केली आहे.

अमित साटम यांच्या अध्यक्षतेखाली जाहिर करण्यात आलेल्या निवडणूक संचालन समितीमध्ये पक्षातील अनेक आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा समावेश आहे. ज्यात आशिष शेलार, ॲड. मंगलप्रभात लोढा, ॲड. राहुल नार्वेकर, प्रकाश मेहता, किरीट सोमैय्या, कालिदास कोळंबकर, मिहिर कोटेचा, पराग शाह, राम कदम, प्रसाद लाड, चित्रा वाघ या महत्त्वाच्या व्यक्तींचा समावेश आहे. तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते मिळून एकूण १४४ जणांची नावे जाहीर करण्यात आली आहेत.दुसरीकडे भारतीय जनता पक्षाच्या मुंबई निवडणूक संचालन समितीमधील निमंत्रितांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पीयूष गोयल यांचा समावेश आहे.



# आंबेडकरांकडून विद्यार्थ्यांनी काय शिकावे ?

६ डिसेंबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन. हा दिवस फक्त महामानवाला वंदन करण्याचा नसून विद्यार्थ्यांसाठी त्यांच्याकडून प्रेरणा घेण्याचा दिवस आहे. बाबासाहेबांचे आयुष्य म्हणजे 'शिकण्याची अखंड तळमळख्र, 'अडचणींना न घाबरण्याची जिद्दख्र आणि 'ज्ञान हीच खरी शक्तीख्र हा मूलमंत्र जिवंतपणे जगलेले महान व्यक्तिमत्त्व.!


**प्रतिकूल परिस्थितीतही 'शिक्षण' हेच ध्येय**

डॉ. आंबेडकरांचे बालपण जातीय विषमता, दारिद्र आणि सामाजिक भेदभावाने व्यापलेले होते.तरीसुद्धा बाबासाहेबांना शिक्षण घेण्याची ओढ प्रचंड होती.त्यांचे वडील रामजी सकपाळ यांनी शिक्षण हेच तुमचे खरे भांडवल असा मोलाचा संस्कार दिला.रामजी सकपाळ यांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या मदतीने पुण्यातील पंतोजी शाळेतील परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्यांच्या धारिष्ट आणि चिकाटीमुळेच कितीही अडथळे आले तरी विद्याभ्यास सोडायचा नाही हा निर्धार बाबासाहेबांच्या रक्तात भिनला होता.

**दहावीपर्यंतचा प्रवास**

साताऱ्याला त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. बाबासाहेबांच्या दहावीपर्यंतच्या शिक्षणाचा प्रवास खडतर होता. शाळकरी वयातच वयाच्या सहाव्या वर्षी त्यांची आई त्यांना सोडून गेली. मात्र,त्यांनी शाळेला सोडले नाही. शाळेलाच आई बनवून विद्यार्जन केले.शाळेतल्या अडथळ्यांना विद्यार्थ्यांनी ऐकले तरी अंगावर काटा येईल.शाळेत त्यांना माठातील पाणी पिण्याची परवानगी नव्हती. हाताची ओंजळी करून त्यांना खाली बसावे लागत आणि वरून कोणीतरी तुच्छतेने पाणी ओतत. त्यातून त्यांना तहान भागवावी लागत होती. शिक्षक त्यांच्या वह्या, पुस्तकांना हात लावत नसत. त्यांची वह्या पुस्तके तपासत नसत. त्यांचा गृहपाठही विटाळ होतो म्हणून तपासला जात नसे. शिक्षकाचाही तिरस्कार त्यांना सहन करावा लागला. तरीही शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्याला तो गुरगुरल्याशिवाय राहत नाही, हे वाक्य त्यांनी समाजाला सांगितले. विद्यार्थ्यांसाठी हे वाक्य आजही प्रेरणादायी आहे. समस्यांचे भांडवल करण्यापेक्षा लढणे शिका. शिक्षण आत्मसात करा. हा साधा आत्मबोध त्यांच्या या संघर्षातून मिळतो.

१९०७ मध्ये बाबासाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. तुम्हाला माहिती आहे..! बाबासाहेबांना किती गुण मिळाले होते? ७५० पैकी फक्त २८२. मात्र त्या काळात महार जातीतून अर्थात ज्या जातीला शिक्षणाचा अधिकारच नाही त्या जातीतून परीक्षा देणे ती उर्त्तीर्ण होणे हा त्यांचा भीम पराक्रम होता. त्यामुळे त्यांचा सत्कारही झाला. त्यावेळचे समाज सुधारक सिताराम केशव बोले, गुरुवर्य कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी त्यांचा सत्कार केला. कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी त्यांना स्वतः लिहिलेले गौतम बुद्धांचे चरित्र यावेळी भेट दिलेबाबासाहेबांच्या उत्तर आयुष्यात त्यांनी हिंदू धर्मातील चातुर्वर्णाला कंटाळून बौद्ध धर्म स्वीकारला.या पुस्तकाचे असे फार मोठे महात्म्य आहे.



**शिक्षकांचा आवडता विद्यार्थी**

इयत्ता दहावी पर्यंत पेंडसे आणि आंबेडकर या दोन शिक्षकांनी त्यांच्या गुणवत्तेला बघून त्यांना मदत केली. या दोन शिक्षकांपैकी आंबेडकर गुरुजींनी बाबासाहेबांचे आंबावडेकर हे नाव सुटसुटीत करत स्वतःचे नाव आंबेडकर दिले. आंबेडकरांनी या शिक्षकाचे आभार आयुष्यभर मानले. आंबेडकर ज्यावेळेस मोठे व्यक्तिमत्व म्हणून भारतात ओळखायला लागले त्यावेळी आंबेडकरांनी आपल्या कार्यालयात बोलून आपल्या या गुरुजींचा यथोचित सन्मानही केला. विद्यार्थ्यांनी किती विनम्र असावे व आपल्या गुरुप्रती किती श्रद्धावान असावे याचा वस्तुपाठ आंबेडकरांनी घालून दिला आहे. हे झाले शालेय जीवनात, मात्र लंडनमध्ये असताना देखील त्यांचे अर्थशास्त्राचे गुरु सेलिग्मन त्यांनी आंबेडकरांची पाठराखण केली. 'दि इव्हॅल्यूशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया 'या प्रबंधाला त्यांनी जगातला मौलिक ग्रंथ म्हटले आहे.

**परदेशी शिक्षण व समस्या**

बडोद्याच्या दरबारात नोकरी करण्याच्या अटीवर बाबासाहेबांना अमेरिकेला संस्थानाने उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. अस्पृश्य युवकासाठी ही संधी होती. बाबासाहेबांनी या संधीचे सोने केले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात शिक्षण सुरू झाल्यावर त्यांनी विलक्षण वेगाने अध्ययन केले. इकोनॉमिक्स, पॉलिटिकल सायन्स, सोशिओलॉजी यांसह अनेक विषयांत त्यांनी प्राविण्य मिळवले. पुढे लंडनला गेले. परंतु शिष्यवृत्तीची मुदत संपत आल्यानंतर त्यांना शिक्षण अर्धवट ठेवून भारतात परत यावे लागले.

तत्कालीन व्यवस्थेत मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती घेऊन अमेरिकेत, इंग्लंडमध्ये जातो हे देखील अनेकांना आवडले नव्हते. त्यामुळे गायकवाड राजघराण्याच्या कारकुनांनी बाबासाहेबांना शिक्षण अर्धवट सोडून भारतात बोलावले. बाबासाहेबांच्या जागी अन्य कोणी असता तर खचून गेला असता. मात्र मिळेल त्या परिस्थितीत ज्ञानार्जन करणे, हा संदेश त्यांनी दिला आहे. शिक्षण अर्धवट सोडणाऱ्यांसाठी बाबासाहेबांनी हे फार मोठे उदाहरण पुढे केले आहे. बाबासाहेबांनी ज्या परिस्थितीत अर्धवट शिक्षण सोडले पुन्हा ते लंडनला जाऊन आपले शिक्षण पूर्ण करून आले. छत्रपती शाहू महाराज व अन्य समाज बांधवांच्या मदतीने लंडनमध्ये गेले आणि पुन्हा आपले शिक्षण त्यांनी पूर्ण केले. ही घटना विद्यार्थ्यांना शिकवते की, खऱ्या प्रतिभेला कधी ना कधी योग्य हात मिळतोच. पण त्यासाठी प्रतिभावानही तेवढाच मेहनत करणारा, ध्येयवादी असायला हवा.

**उपाशी राहा पण शिका**

लंडनमध्ये राहणे त्याकाळी महागडे होते. कधी कधी बाबासाहेब ब्रेड आणि चहा वर दिवस काढत. मात्र इतक्या डिग्र्या मिळवताना त्यांनी कधीही तक्रार केली नाही. फक्त अभ्यास, अभ्यास आणि अभ्यास-हीच त्यांची साधना. लंडन म्युझियम मध्ये अर्थात ग्रंथालयात जाऊन ते अभ्यास करायचे. लंडन म्युझियममध्ये ते सर्वात आधी जाणारे व सर्वात उशिरा त्या अभ्यासिकेतून निघणारे चिवट विद्यार्थी होते. दोन सँडविच तुकड्यांवर ते दिवस काढायचे. पापड खाऊन रात्र काढणे या कल्पनेने सुद्धा अंगावर काटा येतो इतका संघर्ष त्यांना करावा लागला.

उपाशी राहिलात तरी चालेल पण शिक्षण सोडू नका. आजच्या विद्यार्थ्यांनी या एका वाक्याचा अर्थ खोलात समजून घ्यावा. मोबाईल, इंटरनेट, सोशल मिडिया, स्पर्धा-आजच्या अडचणी त्या काळाच्या तुलनेत क्षुल्लक आहेत. मात्र विदेशात शिकताना त्यांनी राजकारणात पासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला. लालाजींना त्यांनी नम्रपणे सांगितले, बडोदा नरेश यांनी मला अपरिमीत सहाय्य केले आहे. त्यांना दिलेलं वचन न मोडता आपला अभ्यास करणे हेच आपले कर्तव्य आहे कधी काय पकडावे व कधी काय सोडावे याचा वस्तूपाठही त्यांनी विद्यार्थ्यांसाठी या घटनेतून दिला आहे.

**विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांकडून काय शिकावे?**

सर्वात महत्वाचे म्हणजे बाबासाहेबांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग देश बांधणीसाठी केला. थोडक्यात आज महापरिनिर्वाणदिनी त्यांच्या स्मृतीस अभिवादन करताना विद्यार्थ्यांनी काही गोष्टींची उजळणी करणे आवश्यक आहे. तुमच्या हातात पुस्तक बाबासाहेबांमुळे मिळाले आहे त्यांनी तुमच्या शिक्षणाची सोय केली आहे. त्यामुळे बाबासाहेबांचे शिक्षणासंदर्भातील काही आदर्श निश्रि्चत गिरवले पाहिजे.

१. अडचणींना न घाबरणे : परिस्थिती कशीही असो, शिक्षण सोडू नये.

२. स्वप्न मोठे ठेवणे : अमेरिकेत, लंडनमध्ये जाऊन शिक्षण घेण्याचे स्वप्न बघा.

३. कठोर परिश्रम : एक-एक डिग्री रक्ताचं पाणी करून मिळवली.

४. शिस्त आणि वेळेचे नियोजन : अभ्यासात शिस्त कळीचा मुद्दा बनली आहे.

५. शिक्षणाचा सामाजिक उपयोग : पदवी ती समाजाची सेवा करण्यासाठी वापरा.

६. मनाची स्वतंत्रता : शिक्षण माणसाला विचार करण्याचं स्वातंत्र्य देते महत्त्वाचे.

७. सतत शिकत राहणे : पदव्या मिळाल्या तरी ते आयुष्यभर शिकत राहिले.

८. आराखडा आखा : मला शिक्षणातून अंततः काय मिळवायचे ह ठरवा.

आजच्या महापरिनिर्वाण दिनी विद्यार्थ्यांनी एवढेच लक्षात ठेवावे. या भारत भूमीतील प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी बाबासाहेब हे सर्व दृष्टीने एक आदर्श विद्यार्थी म्हणून कित्ता गिरवीण्यायोग्य आहे. भारताच्या इतिहासात असा गुणी विद्यार्थी कुणीही झालेला नाही. त्यांना मानवंदना देताना त्यांच्यासारखे गुणी होण्याची शपथ घेण्याचा आजचा दिवस आहे.

**-प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**कोल्हापूर विभागीय कार्यालय कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# ५० मराठी चित्रपटांना १४ कोटी ६२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य -सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार चित्रपट नगरीचा अंतिम आराखडा मंजूर



मुंबई: सामाजिक आशय, कलात्मक दर्जा आणि प्रयोगशीलतेमुळे वेगळे ठरले आहेत. अशा ५० मराठी चित्रपटांना १४ कोटी ६२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य आपणास वितरित करत आहोत. सन्मानित करतो आहोत. ही केवळ आर्थिक मदत नसून सामाजिक आशय असलेल्या नावीन्यपूर्ण तंत्राचा वापर करणाऱ्या प्रेक्षकांच्या जाणीव जागृतीला हातभार लावणाऱ्या मराठी चित्रपटांना मदत करण्यासाठी शासन नेहमीच प्रोत्साहन देत आले आहे, असेही सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. तसेच चित्रपट नगरीचा अंतिम आराखडा मंजूर झालेला आहे असेही ते म्हणाले.

रविंद्र नाट्यमंदिरात सांस्कृतिक कार्य विभागाच्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे आयोजित दर्जेदार चित्रपटांना अर्थसहाय्य योजनेचा धनादेश वितरण सोहळा, गणेशोत्सव रिल्स स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चित्रपटाचे पोस्टर अनावरण केले. या कार्यक्रमप्रसंगी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार बोलत होते.

यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर,चित्रपट सृष्टीतील कलाकार ,दिग्दर्शक, यासह पुरस्कार विजेते उपस्थित होते.

मंत्री ॲड.आशिष शेलार म्हणाले की, चित्रपट हा फक्त मनोरंजन देणारा प्रयोग नाही; तो समाजाच्या मनाशी थेट संवाद साधणारे, विचार जागवत राहणारे शक्तिशाली माध्यम आहे. स्त्री-समानता, जातीय समता, पर्यावरण, ग्रामीण जीवन, नवउद्योग या असंख्य विषयांवर मराठी आणि भारतीय चित्रपटांनी गेल्या दशकांत जनजागृती केली आहे.फिल्म सिटीचा अंतिम आराखडा मंजूर झालेला आहे. फिल्म सिटीच्या धर्तीवर महाराष्ट्रातच अद्यावत ऑडिओ व्हिज्युअल गेमिंग सेंटर मुंबईत उभा करणार आहोत असेही ते म्हणाले.


मंत्री ॲड.आशिष शेलार म्हणाले की, आज ५० चित्रपटांत - राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित ४ चित्रपट, राज्य पुरस्काराने गौरवलेले ३ चित्रपट, 'अ' दर्जा प्राप्त १० चित्रपट, 'ब' दर्जा प्राप्त २३ आणि 'क' दर्जा प्राप्त १० चित्रपटांचा समावेश आहे. या सर्व चित्रपटांना मिळून एकूण सुमारे १४ कोटी ६२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य आज आपण वितरित करीत आहोत. या योजनेकरिता मूल्यांकन प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडणाऱ्या परीक्षक समितीचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.थ-तएड २०२५ या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल समिटमधून महाराष्ट्राने क्रिएटीव्ह इकॉनॉमी हब होण्याचा ठोस निर्धार व्यक्त केला आहे.

मंत्री श्री शेलार म्हणाले की, महाराष्ट्राला संत-महात्मे, क्रांतिकारक, समाजसुधारक, विचारवंत, कलावंत, खेळाडू यांचा समृद्ध वारसा लाभला आहे. अशा महनीय व्यक्तींच्या जीवनकार्याची ओळख पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे; म्हणूनच शासन विविध क्षेत्रातील थोर व्यक्तिमत्त्वांच्या जीवनावर आधारित चरित्रपट निर्मितीची योजना राबवत आहे. याच योजनेंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची निर्मिती सुरू आहे आणि आज या चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण येथे संपन्न होत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे त्यांच्या कार्याची माहिती नव्या पिढीला होण्यासाठी हा चित्रपट नक्कीच मार्गदर्शक ठरेल, असेही ते म्हणाले.

यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी विभागाच्या योजना व नावीन्यपूर्ण उपक्रम यांची माहिती दिली. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी दर्जेदार चित्रपटांना अर्थसहाय्य योजनेचा धनादेश वितरण सोहळा पार पडला. गणेशोत्सव रिल्स स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.




हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.